MHSO200006252014

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दावा दाखल दिनांक | : | १९/०५/२०१४ | | |
| दावा नोंदणी दिनांक | : | १९/०५/२०१४ | | |
| दावा निकाली दिनांक | : | १८/०७/२०२६ | | |
| कालावधी | : | वर्ष | म | दि |
| | | १२ | ०१ | २९ |

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : श्रीमती पी. आर. कुलकर्णी)

**नियमित दिवाणी दावा क्र. १६१/२०१४** **निशाणी क्र. ६७**

१. साऊबाई मच्छींद्र वाघमोडे **(मयत)**

२. शशीकांत मच्छींद्र वाघमोडे
वय – ३६ वर्षे, व्यवसाय – शेती,

३. चंद्रकांत मच्छींद्र वाघमोडे
वय – ३३ वर्षे, व्यवसाय – शेती,
दोघे रा. सावे, ता. सांगोला, जि. सोलापूर.

: **वादी**

**विरुध्द**

१. नवनाथ मारुती वाघमोडे
वय – ४० वर्षे, व्यवसाय – शेती

२. राजाराम मारुती वाघमोडे
वय – ३८ वर्षे, व्यवसाय – शेती,

३. दादासो मारुती वाघमोडे
वय – ६० वर्षे, व्यवसाय – शेती,
सर्व रा. चिकमहुद, ता. सांगोला, जि. सोलापूर.

: **प्रतिवादी**

---

वादींतर्फे विधिज्ञ – श्री. डी. व्ही. तंडे

प्रतिवादींतर्फे विधिज्ञ – श्री. एस. बी. सरगर

---

## दावा निरंतर ताकीदीसाठी

## न्यायनिर्णय

(दि. १८/०७/२०२६)

**१.** प्रस्तुत दाव्याद्वारे वादींनी निरंतर ताकीदीची मागणी केली आहे.

**२.** मौजे सावे, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील जमिन मिळकती गट क्र. ४१२/१ क्षेत्र ० हे. ८५ आर, ४१२/२ क्षेत्र १ हे. ९० आर, ४१२/३ क्षेत्र १ हे. ९० आर यासी चतुःसिमा पुर्वेस – रस्ता, दक्षिणेस – गट क्र. ४११, पश्चिमेस – ४११ व उत्तरेस – गट क्र. ४१३, ३०१ ह्या मिळकती दाव्याचा विषय असून सदर मिळकतींचा यापुढे 'दावामिळकती' असा संक्षिप्त उल्लेख करण्यात येतो.

वादींचे थोडक्यात कथन असे आहे की,

**३.** प्रस्तुत दावा मिळकती ह्या वादी क्र. १ चे पती व वादी क्र. २ व ३ यांचे वडील मच्छींद्र मारुती वाघमोडे यांनी दि. १८/०१/१९७४ रोजी सुभद्राबाई बाबा दिक्षीत यांचेकडून रक्कम रु. ९०००/– इतक्या किंमतीस कायम खुशखरेदीखताने खरेदी घेतली असून सदर खरेदीखतापासून मच्छींद्र वाघमोडे यांची दावा मिळकतीत शांततामय खरेदी मालकीने कब्जेवहीवाट होती. त्याप्रमाणे त्यांचे नावाची नोंद गावचे हक्कपत्रकी फेरफार क्र. १८४ नुसार झालेली आहे. सदरची दावा मिळकत ही मच्छींद्र वाघमोडे यांनी नोकरीच्या आलेल्या पैशातून खरेदी केलेली असून त्यांचे स्वकष्टार्जित मालकी कब्जेवहीवाटीची आहे. त्यानंतर मच्छींद्र वाघमोडे हे दि. १५/०५/१९७८ रोजी मयत झाले असून त्यांना वादी हे कायदेशीर वारस असून वादीचे नावाची वारस नोंद दावा मिळकतीचे हक्कपत्रकी फेरफार क्र. ३३१ नुसार झालेली आहे. मयत मच्छींद्र वाघमोडे यांचे मृत्यूनंतर दावा मिळकतीमध्ये यातील वादींची वारसाहक्काने

शांततामय कब्जेवहीवाट चालु होती व आजही आहे. त्यानंतर यातील वादी यांनी दावामिळकतीचे आपसात वाटप करुन घेतले असून सदर वाटपाने वादी यांचे नावाची नोंद गावचे हक्कपत्रकी फेरफार क्र. २१९३ नुसार झालेली आहे. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध नव्हता व नाही.

४. वादींचे पुढे असे कथन आहे की, अशी परीस्थीती असताना महादेव मारुती वाघमोडे यांनी वादी व इतर लोकांचे विरुध्द जत येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांचे न्यायालयात रे.मु.क्र. ७७/१९८३ हा दावा दाखल केला होता. सदरच्या दाव्यास प्रस्तुत वादीने वस्तुस्थितीदर्शक कैफीयत दिलेली होती. सदरच्या दाव्याचे कामकाज चालु असताना यातील वादी क्र. १ ही अशिक्षीत, अडाणी तसेच वादी क्र. २, ३ हे अज्ञान असल्याचा गैरफायदा घेण्याचे हेतुने मारुती महादेव वाघमोडे व इतर प्रतिवादी यांनी संगनमत करुन सदर जत येथील न्यायालयासमोर त्रयस्थ बाई उभा करुन साऊबाई मच्छींद्र वाघमोडे असे भासवून खोटे अंगठे घेऊन सदर दाव्यात तडजोड पुरसीस देऊन तडजोड हुकूमनामा अस्तीत्वात आणलेला आहे. सदरच्या बेकायदेशीर तडजोड हुकूमनाम्याचे आधारे प्रतिवादी क्र. २ याने दरखास्त दाखल करुन बेकायदेशीरपणे वाटपतक्ता तयार करुन कब्जा घेण्याचे तयारीत आहे. त्याबाबत तहसिलदार, सांगोला यांचेकडून वादींना सदर दावा मिळकतीचा कब्जा देण्याबाबतच्या नोटीसा मिळाल्यानंतर यातील प्रतिवादींचे गैरकृत्याकाबाबतची जाणीव यातील वादींना झाली. त्याबाबत यातील वादीने प्रतिवादी यांना विचारणा केली असता यातील प्रतिवादी यांनी वादींना दावा मिळकतीतून हुसकावून लावण्याचे हेतूने वादीस दमदाटी देऊन धमक्या दिलेल्या आहेत. त्यामूळे यातील वादींचा दावा मिळकतीत असलेला कब्जा जाण्याची दाट शक्यता झाल्यामूळे वादीस हा दावा दाखल करणे भाग पडले आहे. सबब, वर नमूद कारणास्तव वादीचा दावा मिळकतीत असलेल्या शांततामयत कब्जेवहीवाटीस प्रतिवादी यांनी स्वतः अगर त्यांचेतर्फे त्यांचे गडी, नोकर, चाकर, नातेवाईक इत्यादीमार्फत गैरहक्की हरकत अडथळे करु नये अशी प्रतिवादी यांना निरंतरची ताकीद देण्यात यावी. तसेच मा. तहसिलदार, सांगोला यांचेकडे चालू असलेले दरखास्त/एस.आर./७७/२०१२ चे कब्जाबाबतचे कामकाज स्थगित ठेवण्याबाबतचे आदेश देण्यात यावेत. सबब, वादीचा दावा मंजूर करण्यात यावा अशी वादीने विनंती केली आहे.

५. प्रतिवादी यांनी नि.क्र. १९ वर दाव्यास कैफीयत दिली असून त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील मजकूर त्यांना मान्य व कबुल नाही. वादींनी दावा कलम २ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे जरी वादींच्या नावाच्या दावा मिळकतीबाबत नोंदी झाल्या असल्या तरी त्या नोंदी बेकायदेशीर व रद्दबातल असून त्या रद्द होण्यास पात्र आहेत. वादींचे दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येत आहे. दावामिळकतीबाबत जत येथील रे.मु.क्र. ७७/१९८३ चे दाव्यात दि. ०७/०४/१९८९ रोजी तडजोड हुकूमनामा झाला असून तो हुकूमनामा प्रस्तुत वादी यांचेवर कायद्याने बंधनकारक असलेने हुकूमनामा झाले तारखेपासून प्रस्तुतचा दावा दाखल करेपर्यंत वादींनी त्या हुकूमनाम्याविरुध्द कसलीही दाद कोठेही मागितली नाही. सबब वादीचा दावा मुदतीत नाही.

६. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, वादींनी दावा मिळकतीबाबत दिवाणी न्यायालय क.स्तर, जत येथील रे.मु.क्र. ७७/१९८३ चे कामी दि. ०७/०४/१९८९ रोजी तडजोडीसाठी स्वतःहून संमती दिली असलेले आता वादींना दिवाणी कायद्यातील इस्टॉपल बाय कंडक्ट ॲन्ड इस्टॉपल बाय डॉक्युमेंट्स या तत्वाची बाधा येत आहे. त्यामूळेही वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे. वादींनी दावा कलम ७ब चे विनंती सदरात तहसिलदार, सांगोला यांचेकडे चालू असलेले ७७/२०१२ चे दरखास्तीनुसारचे कब्जाबाबतचे कामकाज स्थगित ठेवणेबाबत मागणी केलेली आहे. मात्र प्रस्तुत न्यायालयास त्याबाबतचे अधिकार क्षेत्र येत नाही.

७. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, वादी तसेच प्रतिवादींच्या एकत्र कुटूंबाच्या सदर दाव्यातील नमूद जमिन मिळकती तसेच इतर मिळकतीबाबत जत येथील दिवाणी न्यायालय क.स्तर यांचे न्यायालयात रे.मु.क्र. ७७/८३ चा वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेसाठीचा दावा वादी महादेव मारुती वाघमोडे यांनी मारुती बाळू वाघमोडे व इतर प्रतिवादी यांचेविरुध्द दाखल केलेला होता. त्या दाव्यात प्रस्तुत दावेतील वादी हे अनुक्रमे प्रतिवादी क्र. १० ते १२ म्हणून सामील होते तर प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १, २ हे अनुक्रमे प्रतिवादी क्र. ८ व ९ तर प्रतिवादी क्र. ३ हे प्रतिवादी क्र. ३ म्हणून सामील होते. त्या दाव्यात वादी प्रतिवादींची अपासात तडजोड होऊन दि. ०७/०४/१९८९ रोजी तडजोड पुरसीस प्रमाणे मे. न्यायालयाचा हुकूमनामा झालेला आहे. त्यानुसार प्रस्तुत वादींना त्या दावामिळकतीमध्ये १/१० एवढा हक्क व

हिस्सा देण्यात आलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील जमिन गट क्र. ४१२ याशिवाय तालुका सांगोला पैकी मौजे सावे येथील जमिन गट क्र. ३०९, चिकमहुद, ता. सांगोला येथील जमिन गट क्र. २९३/२/१/२ तसेच तालुका जत पैकी मौजे बेवनुर येथील जमिन गट क्र. ९८२ या प्रत्येकी जमीनी प्रस्तुत दावेतील प्रस्तुत वादींना १/१० एवढा हक्क व हिस्सा हा तडजोडीतुन देण्यात आलेला आहे.

८. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, त्या तडजोडीस त्या दाव्यातील वादी तसेच प्रतिवादी नं. २ ते १२ यांनी ठरलेप्रमाणे हिस्से कबुल करुन तडजोडी नंतरही पुन्हा हिंदु एकत्र कुटूंब म्हणून राहणेचे कबुल केलेले होते. तसेच याउपर तथापि वादी, प्रतिवादींना एकत्र कुटूंब म्हणून राहणे शक्य न झालेस वादी, प्रतिवादींना दावा मिळकतीमध्ये सरस निरस मानाने ठरलेला आपआपला हिस्सा तटक करुन वाटून घेणेचा हक्क राहील असा मे. न्यायालयाचा हुकूमनामा झालेला होता. त्या हुकूमनामेविरुध्द सदर वादींनी तत्पुर्वी कोठेही अगर कसलीही तक्रार केलेली नव्हती व नाही. मात्र पुढे वादी, प्रतिवादींनी एकत्रात राहणे अशक्य झालेने राजेश मारुती वाघमोडे यांनी जिल्हाधिकारी साहेब, सोलापूर यांचेकडे दरखास्त क्र. ७७/२००९ ची दाखल करुन मे. जत न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार वाटप होऊन पृथकपणे तुटक कब्जा मागण्याची दरखास्त प्रस्तुत वादी तसेच इतरांविरुध्द दाखल केली. त्या दरखास्तीप्रमाणे मे. तहसिलदार, सांगोला यांचेकडून संबंधीत सर्व पक्षकारांना म्हणजेच यातील वादींना सुध्दा दावा मिळकतींचा कब्जा देणेबाबतचे नोटीसा मिळाल्या. विशेष म्हणजे त्या कामात प्रस्तुत वादीपैकी शशिकांत यांनी मे. तहसिलदार यांचेसमोर हजर राहून वाटप तक्ता मान्य व कबुल असलेचे लेखीसुध्दा दिलेले आहे आणि त्यानंतर खोडसाळपणाने मे. प्रांताधिकारी, मंगळवेढा यांचेकडे प्रस्तुत वादींनी वाटप तक्त्याविरुध्द अपील दाखल करुन स्थगिती घेतलेली आहे. त्या अपीलाचे काम प्रलंबित आहे आणि त्यानंतर सदरचा खोटा व बनावट दावा व त्यामध्ये तुर्तातुर्त ताकीद अर्ज दाखल केलेला आहे. अशाप्रकारे वादींनी दावा मिळकत जमीन गट क्र. ४१२ ला आपल्या नावाच्या लावून घेतलेला सर्व नोंदी मुळात रद्दबातल व बेकायदेशीर आहेत. दावा मिळकतीमध्ये एकटया वादींची कब्जा वहीवाट असलेबाबतचा मजकुर साफ खोटा व बनावट आहे. दावा मिळकतीमध्ये तडजोड हुकूमनामेप्रमाणे प्रतिवादींचा अविभक्त हक्क व हिस्सा तसेच कब्जेवहीवाटसुध्दा आहे. सबब, वादींचा दावा खर्चासह नामंजूर करण्याची प्रतिवादी यांनी विनंती

केली आहे.

**९.** वादीतर्फे विधिज्ञ श्री. डी. व्ही. तंडे यांनी युक्तीवाद केला. वादीतर्फे विधिज्ञांनी नि.क्र. ५४ वर लेखी युक्तीवाद दाखल केला. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. बी. सरगर यांनी युक्तीवाद केला.

**१०.** माझे विद्वान पूर्वाधिकारी यांनी नि.क्र. २२ वर मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद करत आहे,

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी हे सिध्द करतात काय की, ते दावामिळकतीचे मालक व कब्जेवहीवाटदार आहेत ? | **नकारार्थी** |
| **1** | Whether plaintiffs proved that, they are owner and possessor of the suit property ? | **In the Negative** |
| २. | वादी हे सिध्द करतात काय की, प्रतिवादींनी दावामिळकतीवरील त्यांच्या ताब्यास हरकत अडथळा केला आहे काय ? | **नकारार्थी** |
| **2** | Whether plaintiffs proved that defendants are obstructing their possession over suit property ? | **In the Negative** |
| ३. | वादी हे कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत काय ? | **नकारार्थी** |
| **3** | Are plaintiffs entitled to relief of permanent injunction as prayed ? | **In the Negative** |
| ४. | प्रस्तुत दावा मुदतीत आहे काय ? | **होकारार्थी** |
| **4** | Is suit within limitation ? | **In the Affirmative** |
| ५. | प्रस्तुत दाव्याला वर्तनाद्वारे तसेच कागदपत्रांद्वारे कायदेशीर प्रतिबंध आहे काय ? | **निरर्थक** |
| **5** | Is suit hit by principle of estoppal by conduct and document ? | **Redundant** |

| | | |
|---|---|---|
| ६. | प्रस्तुत न्यायालयास वादींनी दावा कलम ७ब मध्ये नमूद केलेली मागणीबाबत अधिकारक्षेत्र आहे काय ? | **नकारार्थी** |
| 6 | Whether this Court has jurisdiction to grant relief claimed in plaint prayer clause 7(b) ? | **In the Negative** |
| ७. | काय आदेश व हुकूमनामा ? | **दावा खर्चासह नामंजूर करण्यात येतो.** |
| 7 | What order and decree ? | **The suit is dismissed with costs.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**११.** वादपत्रातील कथन शाबित करण्याकरीता वादींच्या वतीने एकूण दोन साक्षीदार तपासण्यात आले. यापैकी स्वतः वादी क्र. ३ चंद्रकांत मच्छींद्र वाघमोडे (वा.सा.क्र.१) याने नि.क्र. २५ वर त्याचे सरतपासाचे शपथपत्र तसेच साक्षीदार सदाशिव मारुती वाघमोडे (वा.सा.क्र.२) याने नि.क्र. ४७ वर त्याचे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. वादींनी नि.क्र. ५३ वर पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला आहे. वादीने खालील कागदपत्रे पुराव्यात दाखल केली आहेत.

| अ.क्र. | तपशिल | निशाणी |
|---|---|---|
| १ | गट क्र. ४१२/१ चा ७/१२ उतारा | ५८ |
| २ | गट क्र. ४१२/२ चा ७/१२ उतारा | ५९ |
| ३ | गट क्र. ४१२/३ चा ७/१२ उतारा | ६० |
| ४ | फेरफार क्र. १८४ ची सही शिक्याची नक्कल | ६१ |
| ५ | फेरफार क्र. ३३१ ची सही शिक्याची नक्कल | ६२ |
| ६ | फेरफार क्र. २१९३ ची सही शिक्याची नक्कल | ६३ |

**१२.** प्रतिवादीतर्फे पुढील कागदपत्रे दाखल करण्यात आली.

| अ.क्र. | तपशिल | निशाणी |
|---|---|---|
| १ | कब्जेपावतीची सही शिक्याची नक्कल | ६४ |

| | | |
|---|---|---|
| २ | पंचनाम्याची सही शिक्याची नक्कल | ६५ |
| ३ | गट क्र. ४१२ च्या ७/१२ उताऱ्याची संगणकीय प्रत | ६६ |

**१३.** प्रतिवादींना पुरेशी संधी देऊनही त्यांनी मौखिक पुरावा न दिल्याने नि.क्र. १ वरील आदेशान्वये प्रतिवादींचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ७ करीता</u> –**

**१४.** प्रस्तुतचे सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने विवेचनामध्ये पुराव्याची पुन:वृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रीतपणे विचारात घेत आहे.

**१५.** वादी व प्रतिवादी यांच्यातील वादातील मुद्दे विचारात घेण्यापूर्वी उभय पक्षांना मान्य असणाऱ्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी एकाच कुटूंबातील आहेत ही बाब उभय पक्षांना मान्य आहे. वादी व प्रतिवादी तसेच इतर यांच्या दरम्यान रे.मु.क्र. ७७/१९८३ दाखल होता व सदर दाव्यामध्ये प्रस्तुत वादमिळकत समाविष्ट होती ही बाबही उभय पक्षांना मान्य आहे. वादी क्र. १ साऊबाई मयत आहे ही बाब वादातील नाही.

**१६.** वादीचे प्रामुख्याने असे कथन आहे की, दावामिळकत वादी क्र. १ चे पती व वादी क्र. २, ३ यांचे वडील नामे मच्छींद्र मारुती वाघमोडे यांच्या खरेदीमालकीची होती. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे कायदेशीर वारस म्हणून वादी दावामिळकतीचे कायदेशीर मालक व कब्जेदार आहेत. सदरच्या बाबी सिध्द करण्याचे उत्तरदायित्व वादीवर आहे. वादींनी त्यांच्या कथनाच्या पृष्टयार्थ वादी क्र. ३ चंद्रकांत मच्छींद्र वाघमोडे (वा.सा.क्र.१) यांची साक्ष नि.क्र. २५ वर नोंदवली आहे. सदर साक्षीदाराने सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन वादकथनांचा पुर्नरुच्चार केला आहे. वादीने सदाशिव मारुती वाघमोडे (वा.सा.क्र.२) यांचे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर साक्षीदाराने वादीच्या कथनाशी सुसंगत असे कथन सरतपासाच्या शपथपत्रात केले आहे.

**१७.** वादीने नि.क्र. ५८ वर गट क्र. ४१२/१ याचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र. १ साऊबाई हिच्या नावाची नोंद ०

हे. ८५ आर क्षेत्राला झाली आहे. वादींनी नि.क्र. ५९ वर गट क्र. ४१२/२ याचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र. २ शशिकांत यांच्या नावाची नोंद १ हे. ९० आर क्षेत्राला झाली आहे. वादींनी नि.क्र. ६० वर गट क्र. ४१२/३ याचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र. ३ चंद्रकांत यांच्या नावाची नोंद १ हे. ९० आर क्षेत्राला झाली आहे. वादींनी नि.क्र. ६१ वर फेरफार क्र. १८४ याची सहीशिक्याची प्रत हजर केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मच्छींद्र मारुती वाघमोडे याने सुभद्राबाई बाबा दिक्षीत यांच्याकडून गट क्र. ४१२ मधील क्षेत्र खरेदी घेतले आहे. वादींनी नि.क्र. ६२ वर फेरफार क्र. ३३१ ची सहीशिक्याची प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मच्छींद्र मारुती वाघमोडे यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस म्हणून वादीच्या नावाची नोंद गट क्र. ४१२ मधील क्षेत्राला झाली आहे. वादींनी नि.क्र. ६३ वर फेरफार क्र. २१९३ ची सहीशिक्याची नक्कल दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींच्या सामाईकातील गट क्र. ४१२ चे प्रत्यक्ष वहीवाटीनुसार नावे करुन त्यानुसार तपशिल नमूद केला आहे. सदर अभिलेखामध्ये वादींमध्ये दावा मिळकतीचे आपसात वाटप झाल्याचे स्पष्टपणे नमूद नाही.

**१८.** वादींचे असे कथन आहे की, जत येथील न्यायालयात महादेव मारुती वाघमोडे यांनी प्रस्तुत वादी व इतर यांच्याविरुध्द रे.मु.क्र. ७७/१९८३ दाखल केला होता. सदर दाव्यात प्रस्तुत वादींनी कैफीयत दिली होती. परंतु, वादी क्र. १ अशिक्षीत, अडाणी तसेच वादी क्र. २ अज्ञान असल्याचा गैरफायदा घेऊन साऊबाई मच्छींद्र वाघमोडे म्हणून त्रयस्थ बाईस उभा करुन खोटे अंगठे घेऊन दाव्यात तडजोड पुरसीस देऊन तडजोड हुकूमनामा अस्तीत्वात आणला आहे. उलटपक्षी प्रतिवादीचे असे कथन आहे की, रे.मु.क्र. ७७/१९८३ चे दाव्यात प्रस्तुत वादी हे अनुक्रमे प्रतिवादी क्र. १० ते १२ म्हणून सामील होते व प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ व २ हे अनुक्रमे प्रतिवादी क्र. ८ व ९ तसेच प्रस्तुत प्रतिवादी क्र. ३ हे सदर दाव्यात प्रतिवादी क्र. ३ म्हणून सामील होते. सदर दाव्यात तडजोड होऊन तडजोड पुरसीस प्रमाणे हुकूमनामा झालेला आहे. त्यानुसार वादींना दावामिळकतीमध्ये १/१० इतका हक्क व हिस्सा देण्यात आलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील जमीन गट क्र. ४१२ व्यतीरीक्त सांगोला येथील मौजे सावे येथील गट क्र.

३०९, चिकमहुद येथील गट क्र. २९३/२/१/२ तसेच जत येथील मौजे बेवनुर येथील गट क्र. ९८२ यामध्ये वादींना १/१० एवढा हिस्सा तडजोडीने देण्यात आला आहे. सदर दाव्यातील वादी तसेच प्रतिवादी क्र. २ ते १२ यांनी ठरल्याप्रमाणे हिस्से कबूल केले असले तरी पुन्हा एकत्र कुटूंबात राहण्याचे ठरवले. परंतु, वादी व प्रतिवादींना एकत्र कुटूंब म्हणून राहणे शक्य न झाल्यास दावा मिळकतीमध्ये ठरलेला आपापला हिस्सा तुटक करुन घेण्याचा हक्क राहील असे हुकूमनाम्याप्रमाणे ठरले. त्यानुसार राजेश मारुती वाघमोडे यांनी जिल्हाधिकारी साहेब सोलापूर यांच्याकडे दरखास्त क्र. ७७/२००९ दाखल केला आहे.

**१९.** त्याअनुषंगाने वादींचा मौखिक पुरावा विचारात घेणे आवश्यक आहे. वादी क्र. ३ चंद्रकांत मच्छींद्र वाघमोडे (वा.सा.क्र.१) यांच्या नि.क्र. २५ वरील उलटतपासाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादमिळकतीबाबत जत येथील दिवाणी न्यायालयात वाटपाबाबत रे.मु.क्र. ७७/१९८३ हा दावा प्रलंबित होता किंवा कसे याबाबत माहिती नसल्याचे कथन सदर साक्षीदाराने केले आहे. सदर दाव्याला प्रतिवादी पक्षकार होते ही बाब साक्षीदाराने मान्य केली आहे. तसेच, रे.मु.क्र. ७७/१९८३ मध्ये वादी क्र. १ पक्षकार होती व वादी क्र. २ व ३ अ.पा.क. प्रस्तुत वादी क्र. १ असे पक्षकार होते ही बाब सदर साक्षीदाराच्या पुराव्यावरुन दिसून येते. रे.मु.क्र. ७७/१९८३ दि. ०७/०४/१९८९ रोजी निकाली निघाला किंवा कसे याबाबत माहिती नसल्याचे कथन सदर साक्षीदाराने केले आहे. तसेच, सदर हुकूमनाम्यामध्ये १/१० हिस्सा देण्यात आला किंवा कसे हे सांगता येणार नसल्याचे कथन सदर साक्षीदाराने केले आहे. सन १९९९ मध्ये त्यांना प्रथमतः दाव्याबाबत माहिती मिळाल्याचे कथन त्यांनी केले आहे. तसेच, सज्ञान झाल्यापासून प्रस्तुत दावा दाखल करेपर्यंत रे.मु.क्र. ७७/१९८३ मधील हुकूमनामा आव्हानित केला नसल्याचे मान्य केले आहे.

**२०.** चंद्रकांत मच्छींद्र वाघमोडे (वा.सा.क्र.१) यांनी उलटतपासादरम्यान राजाराम वाघमोडे यांनी रे.मु.क्र. ७७/१९८३ च्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकामी जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता याबाबत माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर दरखास्त जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडून तहसिलदार सांगोला यांच्याकडे अंमलबजावणीसाठी पाठविण्यात आली ही बाब सदर साक्षीदाराने मान्य केली आहे. मोजणी कार्यालयाकडून सदर

दरखास्तीच्या अंमलबजावणीकामी मोजणी झाल्याचे माहित नसल्याचे कथन सदर साक्षीदाराने केले आहे. वाटपतक्त्यावर वादी शशिकांत यांनी हजर राहून सही केली आहे किंवा कसे हे सांगता येणार नसल्याचे कथन सदर साक्षीदाराने केले आहे. वादी क्र. २ शशिकांत यांनी सदर दावा चालविण्याबाबत अधिकारपत्र दिले नसल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. वादींनी सन २०१४ मध्ये प्रांतअधिकारी, मंगळवेढा यांच्याकडे तहसिलदार सांगोला यांची कार्यवाही आव्हानित केल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. जत येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांच्यासमोर त्रयस्थ बाईस उभे करुन साऊबाई असे भासवून खोटे अंगठे घेऊन सदर दाव्यात तडजोड पुरसीस देऊन तडजोड हुकूमनामा अस्तीत्वात आणला या कथनाबाबत माहिती नसल्याचे सदर साक्षीदाराने सांगितले आहे.

**२१.** वादीतर्फे सदाशिव मारुती वाघमोडे (वा.सा.क्र.२) यांची साक्ष नि.क्र. ४७ वर नोंदविण्यात आली आहे. त्यांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, रे.मु.क्र. ७७/१९८३ हा वाटपासाठीचा दावा महादेव यांनी दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये प्रस्तुत वादमिळकत समाविष्ट होती तसेच प्रस्तुत वादी पक्षकार होते. सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान सदर दाव्यात तडजोड झाल्याचे मान्य केले आहे. सदर तडजोड हुकूमनाम्यावर अंगठे लावल्याची बाब नाकारली आहे. राजेश यांनी जिल्हाधिकारी सोलापूर येथे सदर दाव्यातील हुकूमनाम्याची बजावणी करीता नोटीस पाठवली असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तसेच, शासकीय सेवक, तलाठी, मंडळ अधिकारी, पोलीस, पंच हे गावात कब्जेपावती करण्याकामी आले होते ही बाब सदर साक्षीदाराने मान्य केली आहे. प्रतिवादीबरोबर गेल्या ५० वर्षांपासून पटत नसल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. साऊबाई ऐवजी त्रयस्थ व्यक्ती उभी करुन खोटे अंगठे घेऊन तडजोड पुरसीस करुन तडजोड हुकूमनामा अस्तीत्वात आणला याबाबत प्रत्यक्ष माहिती नसल्याचे कथन सदर साक्षीदाराने केले आहे. त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये काय नमूद आहे हे माहित नसल्याचे कथन त्यांनी केले आहे.

**२२.** चंद्रकांत मच्छींद्र वाघमोडे (वा.सा.क्र.१) व सदाशिव मारुती वाघमोडे (वा.सा.क्र.२) यांच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, जत येथील न्यायालयामध्ये रे.मु.क्र. ७७/१९८३ वाटपासाठीचा वादी, प्रतिवादी तसेच इतर यांच्या कुटूंबातील सदस्यांनी दाखल केला होता.

सदर दाव्यामध्ये प्रस्तुत दाव्यातील वादविषय म्हणजे गट क्र. ४१२ समाविष्ट होता. सदर दाव्यामध्ये तडजोड झाली. वादीचे प्रामुख्याने असे कथन आहे की, सदर दाव्यामध्ये साऊबाई व वादी क्र. २ व ३ यांना फसवून तडजोड हुकूमनामा अस्तीत्वात आणला. परंतु, वादी साक्षीदारांचा उलटतपास सदर कथनांबाबत मोघम आहे. वादी साक्षीदारांनी पुराव्यादरम्यान स्पष्टपणे फसवणूक केल्याबाबत, खोटे अंगठे घेतल्याबाबत कथन केलेले नाही. तसेच वादींनी सदर हुकूमनाम्याची प्रत अभिलेखावर दाखल केलेली नाही. अथवा वादींच्या कथनांप्रमाणे सदर हुकूमनामा बेकायदेशीर असल्याबाबत सक्षम न्यायालयामध्ये दाद मागितलेली नाही. प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादमिळकतीव्यतीरीक्त इतर मिळकतींमध्ये वादींना १/१० हिस्सा देण्यात आला आहे. चंद्रकांत वाघमोडे (वा.सा.क्र.१) यांनी सदरची बाब स्पष्टपणे नाकारलेली नाही. तसेच, यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे रे.मु.क्र. ७७/१९८३ चा तडजोड हुकूमनाम्याची प्रत प्रस्तुत प्रकरणात दाखल नसल्यामूळे सदर दाव्यातील घडामोंडीबाबत स्पष्टता नाही.

**२३.** प्रतिवादींनी नि.क्र. ६४ वर कब्जेपावतीची सहीशिक्यांची नक्कल दाखल केली आहे. तसेच, प्रतिवादींनी पंचनाम्याची सहीशिक्याची प्रत नि.क्र. ६५ वर दाखल केली आहे. प्रतिवादींनी गट क्र. ४१२ चा संगणकीय ७/१२ उतारा नि.क्र. ६६ वर दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी व्यतीरीक्त इतरांच्या नावाची नोंद गट क्र. ४१२ च्या ७/१२ उताऱ्यावर झाली आहे. वादींनी प्रस्तुत दाव्यात गट क्र. ४१२/१ मधील ० हे. ८५ आर, गट क्र. ४१२/२ मधील १ हे. ९० आर व गट क्र. ४१२/३ मधील १ हे.९० आर इतके क्षेत्र वादमिळकत म्हणून दाखवले आहे. परंतु, सध्याच्या गट क्र. ४१२ च्या नि.क्र. ६६ वरील ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, भानुदास मारुती वाघमोडे यांच्या नावाची नोंद ० हे. ६६ आर क्षेत्राला झाली आहे. दादासो मारुती वाघमोडे, प्रतिवादी क्र. ३ यांच्या नावाची नोंद १ हे. ३३ आर क्षेत्राला झाली आहे. नवनाथ मारुती वाघमोडे प्रतिवादी क्र. १ यांच्या नावाची नोंद १ हे. ३३ आर क्षेत्राला झाली आहे. तसेच वादी क्र. १ ते ३ यांच्या नावाची नोंद १ हे. ३३ आर सामाईक क्षेत्राला झाली आहे. याबाबतचा खुलासाही वादीने केलेला नाही. यापूर्वीच कथन केल्याप्रमाणे वादींच्या रे.मु.क्र. ७७/१९८३ बाबतच्या कथनाबाबत तसेच पुराव्याबाबत संधिग्धता आहे. वादीने दावा मिळकतीची मालकी व कब्जा मच्छींद्र मारुती वाघमोडे यांच्या हक्कातील खरेदीखताआधारे व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे

वारस म्हणून तसेच वादीमध्ये वाटपाद्वारे कथन केली आहे. रे.मु.क्र. ७७/१९८३ हा दावा वाटपाचा होता. वादींच्या कथनाप्रमाणे दावामिळकत मच्छींद्र मारुती वाघमोडे यांची स्वकष्टार्जित होती. प्रस्तुत दावामिळकत सदर वाटपाच्या दाव्यात समाविष्ट असल्याबाबतचा खुलासा वादीने केलेला नाही. अभिलेखावर दाखल नि.क्र. ६६ वरील गट क्र. ४१२ च्या ७/१२ उताऱ्यावरुन वादींची दावा मिळकतीची ते कथन करत असल्याप्रमाणे मालकी कब्जा दिसून येत नाही. अशा परीस्थीतीमध्ये वादी कथन करतात त्याप्रमाणे ते दावामिळकतीचे मालक व कब्जेदार असल्याचे दिसून येत नाही.

**२४.** प्रतिवादी तर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादींनी रे.मु.क्र. ७७/१९८३ चे कामी तडजोडीसाठी स्वतःहून संमती दिली आहे. अशा परीस्थीतीत वादी सदर तडजोड नाकारु शकत नाहीत. त्यामूळे वादींना दिवाणी कायद्याचे इस्टोपल बाय कंडक्ट व इस्टोपल बाय डाक्युमेंट या तत्वाची बाधा येते. यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे रे.मु.क्र. ७७/१९८३ चा अभिलेख दाखल करण्यात आलेला नाही. त्यामूळे वादींना इस्टोपलची बाधा येते किंवा कसे याबाबतचा पुरावा अभिलेखावर नाही.

**२५.** प्रतिवादींनी असा युक्तीवाद केला की, तहसिलदार, सांगोला यांच्याकडे चालू असलेले प्रकरण क्र. ७७/२०१२ चे दरखास्तीनुसार कब्जाबाबतचे कामकाज स्थगित ठेवण्याबाबतची वादीची मागणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या बाहेरची असल्यामूळे मान्य करता येणार नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी दरखास्त/एसआर/७७/२०१२ चे तहसिलदार सांगोला यांच्याकडे कब्जाबाबतचे कामकाज स्थगित ठेवण्याबाबतचा आदेश करण्यात यावा अशी मागणी केली आहे. परंतु, वादींनी दरखास्त क्र. ७७/२०१२ याबाबतची कागदपत्रे अभिलेखावर आणलेली नाहीत. तसेच दाव्यात व वादपत्रात कोणत्या प्रकरणातील नोटीसीमुळे वादींना प्रतिवादींच्या कथीत गैरकृत्याची माहिती मिळाली हे स्पष्टपणे नमूद नाही.

**२६.** चंद्रकांत वाघमोडे (वा.सा.क्र.१) यांच्या पुराव्यानुसार त्यांना सन १९९९ मध्ये रे.मु.क्र. ७७/१९८३ बाबत माहिती मिळाली. वादीच्या कथनानुसार वादीला नोटीसमुळे

गैरकृत्यांची माहिती मिळाली. सबब वादीच्या कथनांमध्ये व पुराव्यामध्ये विसंगती दिसून येते. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांवरुन असे अनुमान निघते की, सदरची दरखास्त रे.मु.क्र. ७७/१९८३ च्या दाव्यातील हुकूमनाम्याच्या आधारे दाखल झाली आहे. सदर दरखास्तीमध्ये वादींनी फसवणूक करुन तडजोड दर्शविली असल्याचे कथन केले असले तरीसुध्दा सदर दावा तडजोडीने निकाली झाला असल्याचे अमान्य केले नाही. सबब, रे.मु.क्र. ७७/१९८३ च्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ नुसार सुरु असल्याचे अनुमान निघते. अशा परीस्थीतीमध्ये वादींना रे.मु.क्र. ७७/१९८३ मधील हुकुमनामा तडजोड हुकूमनामा असल्याच्या अनुमानानुसार सदर हुकूमनामा अमान्य असल्यास ज्या न्यायालयाने सदर हुकूमनामा पारीत केला त्यांच्याकडे दाद मागणे आवश्यक आहे. प्रस्तुत दाव्याद्वारे अप्रत्यक्षरीत्या वादी रे.मु.क्र. ७७/१९८३ बाबत दाद मागू शकत नाहीत. तसेच, चंद्रकांत वाघमोडे (वा.सा.क्र.१) यांच्या उलटतपासानुसार प्रांत अधिकारी मंगळवेढा यांच्याकडे तहसिलदार, सांगोला यांची कार्यवाही आव्हानित केली होती. सबब, सदरची वादींची मागणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर आहे.

**२७.** प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, प्रस्तुतचा दावा मुदतीमध्ये नाही. चंद्रकांत वाघमोडे (वा.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, त्यांचा जन्म सन १९७७ साली झाला व रे.मु.क्र. ७७/१९८३ च्या हुकूमनाम्याबाबत त्यांना १९९९ साली माहिती मिळाली. सबब, वादी सज्ञान झाल्यापासून मुदतीमध्ये त्यांनी रे.मु.क्र. ७७/१९८३ चा हुकूमनामा आव्हानित केलेला नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने दाव्यास कारण दि. १७/०५/२०१४ रोजीची तहसिलदार यांची नोटीस असल्याचे नमूद केले आहे. वादीने स्पष्टपणे व प्रत्यक्षरीत्या रे.मु.क्र. ७७/१९८३ च्या अनुषंगाने प्रस्तुत दाव्यात कोणतीही दाद मागितलेली नाही. वादीने प्रस्तुतचा दावा दि. १९/०५/२०१४ रोजी दाखल केला आहे व दाव्यास कारण दि. १७/०५/२०१४ रोजीची नोटीस असे नमूद आहे. मुदतीच्या कायद्यानुसार दावा दाखल करण्याचा हक्क निर्माण झाल्यापासून वादीने ३ वर्षांच्या आत दावा दाखल करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा वादीच्या कथनानुसार दाव्यास कारण घडल्यापासून ३ वर्षांच्या आत दाखल केला आहे. सबब, वादीच्या दाव्याच्या कारणानुसार वादीचा दावा मुदतीत आहे.

२८. मात्र, यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे वादी दावामिळकतीचे मालक व कब्जेदार असल्याचे सिध्द करण्यास वादी असमर्थ ठरले आहेत. प्रतिवादी वादीच्या दावामिळकतीवरील कब्जास हरकत अडथळा करत आहेत असा कोणताही सबळ पुरावा वादींनी अभिलेखावर आणला नाही. प्रतिवादी वादींना धमक्या देऊन दावा मिळकतीतून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करत आहेत याचा पुरावा नाही. वादींच्या हक्कातील दायित्वाचा प्रतिवादी भंग करत आहेत असा पुरावा वादींनी आणला नाही. सबब, वादी मागणी करत असल्याप्रमाणे निरंतर ताकीदीचा अनुतोष मिळण्यास पात्र नाहीत. वादी मागणी करत असलेली दाद मंजूर करणे न्यायोचित असल्याचे दिसून येत नाही. सबब, मुद्दा क्र. १ ते ३, ६ चे उत्तर नकारार्थी, मुद्दा क्र. ४ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र. ५ चे उत्तर मुद्दा निरर्थक असे देण्यात येत आहे. वादीच्या दाव्यामुळे प्रतिवादींना त्यांच्या हक्कासाठी न्यायालयामध्ये दाद मागावी लागली आहे. सबब, दाव्याचा खर्च वादींवर बसवणे योग्य व न्यायोचित होईल. मुद्दा क्र. ७ च्या उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो,

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा दावा खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

२. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

३. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.07.18 13:27:51 +0530

**(श्रीमती पी. आर. कुलकर्णी)**

दि. १८/०७/२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

सांगोला.

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १८/०७/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | १८/०७/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | १८/०७/२०२६ |